**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**सोमवार दिनांक २८ ऑक्टोबर २०२४**

**ठळक बातम्या**

1. **विधानसभा निवडणुकांसाठी भारतीय जनता पक्षाची तिसरी आणि राष्ट्रवादी शरद चंद्र पवार पक्षाची चौथी यादी जाहीर.**
2. **काँग्रेसचे माजी मंत्री आमदार अनीस अहमद यांचा वंचित बहुजन आघाडीत प्रवेश, मध्य नागपूर मधून लढणार निवडणूक; तर भाजप कडून प्रवीण दटके यांना उमेदवारी.**
3. **मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह राज्यात अनेक उमेदवारांचे अर्ज दाखल.**
4. **कुंपणात अनधिकृत वीज प्रवाह सोडलेला आढळल्यास महावितरण कडून फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येणार.**
5. **दिवाळीच्या मंगल पर्वाला आज गोवत्स द्वादशीने सुरुवात.**

**-----------------------------------------**

**भाजप तिसरी यादी**

**भारतीय जनता पक्षातर्फे विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची तिसरी यादी आज जारी करण्यात आली. अकोला जिल्ह्यातील मूर्तिजापूर इथून हरीश पिंपळे, वाशिम जिल्ह्यातील कारंजा मतदार संघातून सई डहाके, अमरावती जिल्ह्यातील तिवसा मतदारसंघातून राजेश वानखेडे, अमरावती जिल्ह्यातील मोर्शी मतदारसंघातून उमेश यावलकर, वर्धा जिल्ह्यातील आर्वी मतदार संघातून सुमित वानखेडे, यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. नागपूर जिल्ह्यातील काटोल मतदार संघातून चरण सिंग ठाकूर, सावनेर मधून डॉ.आशिष देशमुख, नागपूर-मध्य मधून प्रवीण दटके; नागपूर-पश्चिम मधून सुधाकर कोहळे, नागपूर-उत्तर मधून डॉ.मिलिंद माने, यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. भंडारा जिल्ह्यातील साकोली मतदारसंघातून अविनाश ब्राह्मणकर, चंद्रपूर मतदारसंघातून किशोर जोरगेवार, यवतमाळ जिल्ह्यातील आरणी मतदार संघातून राजू तोडसाम, आणि यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड मतदारसंघातून किशन वानखेडे यांना उमेदवारी जाहीर झाली आहे.**

**-----------------------------------------**

**राष्ट्रवादी- चौथी यादी**

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाने विधानसभा निवडणुकीसाठी सात उमेदवारांची चौथी यादी जाहीर केली आहे. यामध्ये नागपूर जिल्ह्यातील काटोल मतदार संघातून सलील अनिल देशमुख आणि यवतमाळ जिल्ह्यातील पुसद मतदार संघातून शरद मैंद यांना उमेदवारी घोषित केली आहे. शरद पवार यांच्या राष्ट्रवादीने जाहीर केलेल्यांपैकी पहिल्या यादीत ४५, दुसऱ्या यादीत २२ उमेदवार, तिसऱ्या यादीत ९, तर चौथ्या यादीत ७ नावांची घोषणा करण्यात आल्यानं आतापर्यंत एकूण ९२ उमेदवारांची नावं जाहीर झाली आहेत.

---------------------------------------------

अनिस अहमद

महाराष्ट्रात विधानसभा निवडणुकीची लगबग सुरु असताना काँग्रेसचे माजी मंत्री अनिस अहमद यांनी तिकीट न मिळल्याने पक्षाचा राजीनामा दिला असून आज वंचित बहुजन आघाडी पक्षात प्रवेश केला. ते आता वंचित कडून मध्य नागपूर विधानसभा मतदारसंघातून निवडणूक लढवणार आहेत. वंचित बहुजन आघाडी पक्षाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश आंबेडकर यांच्या उपस्थित त्यांनी पक्षाचा झेंडा हाती घेतला. अनिस अहमद यांनी यापूर्वी सलग तीन वेळा मध्य नागपुर विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व केलं आहे. ते यंदाही या मतदारसंघातून निवडणूक लढवण्यास आग्रही होते. पण, काँग्रेस पक्षाने मागील विधानसभा निवडणुकीत दुसऱ्या क्रमांकावर राहिलेले बंटी शेळके यांना पुन्हा एकदा उमेदवारी दिली आहे.

---------------------------------------------

प्रवीण दटके उमेदवारी

भारतीय जनता पक्षाद्वारे विधानसभा मतदारसंघांसाठी तिसरी यादी जारी करण्यात आली आहे. मध्य नागपूर मधून प्रवीण दटके यांना उमेदवारी जाहीर झाली आहे. उद्या सकाळी 10 वाजता पंडित बच्छराज व्यास यांच्या पुतळ्याला अभिवादन करून संविधान चौकापासून रॅली निघेल. त्यानंतर ते अर्ज भरणार असल्याची माहिती आमच्या प्रतिनिधीनं दिली आहे. उमेदवारी जाहीर होताच दटके यांच्या समर्थकांमध्ये जल्लोषाचं वातावरण आहे. प्रवीण दटके 2014 ते 2017 या काळात नागपूरचे महापौर होते. सध्या ते भाजपच्या युवा मोर्चाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष आहेत. महाल भागातून दटके 3 वेळा नगरसेवक झाले आहेत.

---------------------------------------------

उमेदवारी अर्ज

राज्य विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा उद्या शेवटचा दिवस आहे. आज अनेक पक्षांचे दिग्गज नेते अर्ज दाखल करत आहेत. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ठाणे जिल्ह्यातल्या कोपरी - पाचपाखाडी मतदारसंघातून उमेदवारी

अर्ज भरला. तत्पूर्वी निघालेल्या रॅलीत भाजप नेते उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सहभागी झाले होते. महायुती विधानसभा निवडणुकीसाठी पूर्णपणे सज्ज असून या मतदार संघातूनच नव्हे तर सर्वच मतदारसंघातून महायुतीचे उमेदवार निवडून येतील असा विश्वास उपमुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी व्यक्त केला. ठाणे शहर विधानसभेचे भाजपचे उमेदवार संजय केळकर यांचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी देखील त्यांनी हजेरी लावली होती. यावेळी बोलतांना त्यांनी हा विश्वास व्यक्त केला. कागल मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे हसन मुश्रीफ यांनी देखील आज अर्ज भरला. बारामती मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख, उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज अर्ज दाखल केला. याच मतदारसंघातून राष्ट्रवादी काँग्रेसचे शरदचंद्र पवार पक्षाचे उमेदवार युगेंद्र पवार यांनी देखील आज उमेदवारी अर्ज भरला. मुंबईतल्या माहिम मतदारसंघातून महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे उमेदवार अमित ठाकरे यांनी आज अर्ज दाखल केला. पक्षाचे अध्यक्ष राज ठाकरे यावेळी उपस्थित होते. विदर्भात चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी मधून कॉंग्रेसचे उमेदवार आणि ज्येष्ठ नेते विजय वडेटीवार यांनी आज आपला उमेदवारी अर्ज भरला तर बल्लारपूर मतदार संघातून निवडणूक लढविण्यासाठी आज विद्यमान वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी देखील आपला अर्ज दाखल केला. प्रहार जनशक्ती पक्षाचे प्रमुख आणि परिवर्तन महाशक्तीचे उमेदवार बच्चू कडू यांनी अचलपूर-चांदूरबाजार विधानसभा मतदारसंघातून नामांकान रॅली काढत सलग सहाव्यांदा आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. गोंदिया जिल्ह्यातील आमगाव देवरी विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार संजय पुराम यांनी आज देवरी उप विभागीय कार्यलयात नामांकन अर्ज दाखल केला. तिरोडा विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार विजय रहांगडाले यांनी खा प्रफुल पटेलांच्या उपस्थितीत तिरोडा उपविभागीय अधिकारी कर्यलयात नामांकन अर्ज दाखल केला. वाशिम विधानसभा मतदारसंघांमध्ये शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने डॉक्टर सिद्धार्थ देवळे यांनी आज दुपारी उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी वाशिम यवतमाळ रिसोड मतदारसंघाचे खासदार संजय देशमुख आणि महाविकास आघाडीतील इतर पदाधिकाऱ्यांची उपस्थिती होती. गडचिरोली विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पक्षाचे उमेदवार डॉ. मिलिंद नरोटे यांनी आज रॅली काढून आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. या रॅलीत माजी मंत्री डॉ.परिणय फुके, माजी खासदार अशोक नेते यांच्यासह पक्षाचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते सहभागी झाले होते. गोंदिया जिल्ह्यातील अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्राचे महायुतीचे उमेदवार माजी मंत्री राजकुमार बडोले यांनी खा प्रफुल पटेल यांच्या उपस्थितीत उपविभागीय अधिकारी कार्यलयात नामांकन अर्ज दाखल केला. दरम्यान, काँग्रेस प्रदेशाअध्यक्ष नाना पटोले यांनी गोंदिया जिल्याच्या तिरोडा विधानसभा क्षेत्राची परंपरिक जागा ही राष्ट्रवादी शरद पवार गटाचे नेते गुड्डू बोपचे

यांना दिल्याने संतापलेल्या काँग्रेस कार्यकर्त्यांनी ही जागा बदलून कॉग्रेस पक्षाला द्यावी या साठी काँग्रेस पक्षांच्या एका जिल्हा परिषद सदस्यां सह इतर पाच लोकांनी नामांकन अर्ज दाखल केला आहे.

------------------------------------------

महावितरण

वन्य प्राण्यांपासून होणारी पिकांची नासाडी रोखण्यासाठी काही शेतकरी कुंपणात वीज प्रवाह सोडत असल्याचं महावितरणच्या निदर्शनास आलं आहे. त्यामुळे वन्य प्राण्यांसोबत शेतात कामांसाठी गेलेल्या आणि अनावधानाने कुंपणास स्पर्श करणा-या शेतकऱ्यांचा वीजेचा धक्का लागून मृत्यू होत असल्याची बाब समोर आली आहे. यासाठी आकडे टाकून वीज चोरी होत असल्याचं देखील निदर्शनास आलं आहे. महावितरणने या प्रकारांची गंभीर दखल घेतली असून यापुढे कुंपणात अनधिकृत वीज प्रवाह सोडलेला आढळल्यास संबंधितावर विद्युत कायद्याच्या विविध कलमा अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात येणार आहे. त्यासाठी तांत्रिक कर्मचारी तसेच भरारी पथकाच्या माध्यमातून शेतशिवारात गस्त घालण्यात येणार आहे. संभाव्य जीवितहानीची शक्यता लक्षात घेऊन संबंधितावर फौजदारी गुन्हा देखील दाखल केला जाऊ शकतो, असा इशारा महावितरणने दिला आहे.

------------------------------------------

वसुबारस

आनंद आणि उत्साहाचं पर्व असलेल्या दीपोत्सवाला आज वसुबारसेच्या पूजनाने प्रारंभ झाला. वसुबारसला गोवत्स द्वादशी असंही म्हणतात. सवत्स धेनु अर्थात गाय आणि वासराची पूजा करून दिवाळीला घरोघरी सुरुवात झाली. गाईला कामधेनू देखील संबोधिल्या जात असल्यानं या दिवशी तिची पंचोपचार पूजा करून तिला नैवेद्य अर्पण केला जातो. कुटुंबाचं कल्याण व्हावं, भरभराट व्हावी म्हणून भारतीय संस्कृतीत आजच्या दिवसाचं विशेष महत्व आहे. या पार्श्वभूमीवर बाजारपेठेत आकाशदिवे, रोषणाईच्या माळा, आणि गृहसजावटीच्या साहित्यासह फटाके, फराळाच्या साहित्य खरेदीसाठी नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. दरम्यान, महाराष्ट्राचे राज्यपाल सी.पी.राधाकृष्णन यांनी राज्यातल्या जनतेला धनत्रयोदशी तसंच दीपावलीनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. आजच्या वसुबारस तसंच उद्या असणाऱ्या धनत्रयोदशीपासून सुरू होणारी दिवाळी आनंद, समृद्धी आणि सुख शांती घेऊन येवो, असं राधाकृष्णन यांनी आपल्या समाजमाध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे. लक्ष्मीपूजना निमित्त शुक्रवारी १ नोव्हेंबर रोजी नागपूर शहरातील सर्व कत्तलखाने आणि मांस विक्रीची दुकाने बंद राहणार आहे. या संदर्भातील आदेश मनपाचे घनकचरा व्यवस्थापन विभाग

संचालक आणि  उपायुक्त डॉ. गजेंद्र महल्ले यांनी निर्गमीत केले आहे. आदेशाचे उल्लंघन केल्यास मनपाच्या भरारी पथकाद्वारे कार्यवाही करण्यात येईल.

-----------------------------------------

दक्षता जनजागृती सप्ताह

सार्वजनिक जीवनात सक्षमतेला चालना देण्यासाठी आणि भ्रष्टाचारमुक्त समाज निर्माण करण्यासाठी दरवर्षी प्रमाणे यंदाही २८ ऑक्टोबर ते ३ नोव्हेंबर या कालावधीत  दक्षता जनजागृती सप्ताहाचं आयोजन करण्यात आलं आहे. "सत्यनिष्ठेच्या संस्कृतीच्या माध्यमातून राष्ट्र समृध्दी" ही या वर्षीच्या दक्षता सप्ताहाची संकल्पना आहे. मंत्रालय, विभाग, सार्वजनिक उपक्रम, बँका आणि इतर सर्व संस्थांमधील सार्वजनिक सेवकांकडून प्रतिज्ञा घेऊन आज सप्ताहाची सुरुवात होत आहे. आकाशवाणीच्या महासंचालक प्रग्या पालीवाल गौर यांनी आकाशवाणी दिल्लीमध्ये कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना सतर्कतेची शपथ दिली. त्याचप्रमाणे आकाशवाणी नागपूरच्या प्रांगणात देखील अधिकारी आणि कर्मचारी यांनी सतर्कतेची शपथ घेतली. विभागीय आयुक्त कार्यालयाच्या सभागृहात देखील आयोजित कार्यक्रमात प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी दीपाली मोतीयेळे यांनी उपस्थित अधिकारी-कर्मचाऱ्यांना भ्रष्टाचार निर्मूलनाची शपथ दिली.

-----------------------------------------